# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.
## नगरसचिव कार्यालय

**महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एम.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकाराचा वापर करुन मा.प्रशासक यांनी मंजूरी दिलेले दिनांक २८/०१/२०२५ चे ठराव**

---

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ८३०** **विषय क्रमांक - ८३०**

**दिनांक - २८/०१/२०२५** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| ठराव क्र. ८३० <br> दिनांक - <br> २८/०१/२०२५ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.डक्षे/स्था/कावि/९०/२०२५ दि.१६/०१/२०२५ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्र.४६९८ दि.१६/०१/२०२५ अन्वये, भांडवली गुंतवणूकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य योजना २०२४-२५ अंतर्गत कार्यरत महिलांसाठी वसतिगृहांचे बांधकाम (योजना भाग १०) असे नविन लेखाशिर्ष उघडून त्यात प्रभाग क्र.२५ वाकड येथे कार्यरत महिलांसाठी वसतिगृह बांधणेस मान्यता देणे बाबत. |
| ठराव क्र. ८३० <br> दिनांक - <br> २८/०१/२०२५ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.डक्षे/स्था/कावि/९०/२०२५ दि.१६/०१/२०२५ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्र.४६९८ दि.१६/०१/२०२५ अन्वये, पिंपरी चिंचवड शहराचा विकास झपाट्याने होत असून शहराच्या लगत हिंजवडी आय.टी. पार्क, भोसरी एम.आय.डी.सी. व तसेच इतर आय.टी. कंपन्या आहेत. पिंपरी चिंचवड शहर परिसरात कार्यरत महिलांच्या संख्येत वाढ होत असून त्यांना राहणेसाठी वसतिगृहाची आवश्यकता आहे. सदर वसतिगृहाबाबत शासन निर्णय क्र संकीर्ण-२०२४/प्र.क्र.७४/नवि-०४, दि.१०/१२/२०२४ शासन निर्णयानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील प्रभाग क्र.२५ वाकड येथे कार्यरत महिलांसाठी वसतिगृह उभारणे शक्य आहे. तथापि सदर कामाचा सन २०२४-२५ चे मुळ अंदाजपत्रकात समावेश नाही. परंतू सदरचे कामाची आवश्यकता लक्षात घेता "भांडवली गुंतवणूकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य योजना २०२४-२५ अंतर्गत कार्यरत महिलांसाठी वसतिगृहांचे बांधकाम (योजना भाग १०)" असे नविन लेखाशिर्ष उघडून त्यात "प्रभाग क्र.२५ वाकड येथे कार्यरत महिलांसाठी वसतिगृह बांधणे" या नविन कामाचा सन २०२४-२५ चे अंदाजपत्रकात समावेश करून र.रू.९० कोटी इतक्या रक्कमेस मा.महापालिका सभेची मान्यता देणे आवश्यक असल्याने खालील प्रमाणे मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |

| अनु क्र. | कामाचे नाव | लेखाशिर्ष | पान क्र./ अनु क्र. | मुळ प्रशासकीय मान्यता | सुधारित प्रशासकीय मान्यता | सन २०२४-२०२५ ची मुळ तरतुद | वाढ करावयाची तरतुद | घट करावयाची तरतुद | सन २०२४-२०२५ सुधारीत तरतुद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.२५ वाकड येथे कार्यरत महिलांसाठी वसतिगृह बांधणे | भांडवली गुंतवणूकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य योजना २०२४-२५ अंतर्गत कार्यरत महिलांसाठी वसतिगृहांचे बांधकाम (योजना भाग १०) | नविन | - | ९० कोटी | ० | १० लाख | ० | १० लाख |
| २ | प्रभाग क्र.२५ पुनावळे येथील सर्व्हे नं.२८ ते ३२ मधून जाणारा १८.०० मी. रूंद डी.पी. रस्ता विकसीत करणे. (बजेट कोड 222300563) | स्थापत्य विशेष योजना (पेव्हमेंट मॅनेजमेंट सिस्टीम अहवालानुसार रस्ते सुधारणा अंतर्गत कामे करणे.) | २८ / ५० | २० कोटी | २० कोटी | ५० लाख | ० | १० लाख | ४० लाख |
| | एकूण | | | २० कोटी | ११० कोटी | ५० लाख | १० लाख | १० लाख | ५० लाख |

| | |
|---|---|
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ८३१** **विषय क्रमांक - ८३१**

**दिनांक - २८/०१/२०२५** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| ठराव क्र. ८३१ दिनांक - २८/०१/२०२५ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.कर/मुख्य/०९/कावि/४२/२०२५ दि.१७/०१/२०२५,आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्र.४७३३ दि.२१/०१/२०२५ अन्वये, सन 2025-2026 या सरकारी वर्षाकरिता करांचे व करेत्तर बाबींचे दर निश्चिती करणेस मान्यता देणे बाबत. |
| ठराव क्र. ८३१ दिनांक - २८/०१/२०२५ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.कर/मुख्य/०९/कावि/४२/२०२५ दि.१७/०१/२०२५, आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्र.४७३३ दि.२१/०१/२०२५ अन्वये, मनपाचे कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 127 व 129 मधील तरतूदीनुसार शहरातील इमारत व जमिनीवर मालमत्ता कर आकारणीची तरतूद आहे. आकारणी रजिस्टरला नोंद असलेल्या मालमत्तांवर कलम 99 मधील तरतूदीनुसार मा.महापालिका सभेने मंजूर केलेल्या दराने मालमत्ता कराची आकारणी करणेत येते. तसेच शासनाचे शिक्षणकर, रोजगार हमी कर व फ्लोअरेज कराची वसुली राज्य शासनाने ठरवून दिलेल्या दराने महाराष्ट्र शासनाचे करिता केली जाते. सन 2025-2026 या सरकारी वर्षाकरिता दिनांक 20 फेब्रुवारी, 2025 |

पूर्वी करांचे दर ठरविणे आवश्यक आहे. सबब महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम 99 मधील तरतूदीनुसार सन 2025-2026 या वित्तिय वर्षासाठी खालील प्रमाणे कर व करेत्तर बाबींचे दर मंजूरीसाठी सादर करण्यात येत आहे. सन 2025-2026 या सरकारी वर्षाकरिता करांचे व करेत्तर बाबींचे दर निश्चितीबाबत.

करांचे दर

| अ. क्र. | कराचे नाव | करआकारणी पध्दत करयोग्यमूल्यावर | सन 2024-2025 चे प्रचलित दर (सध्याचे) | | सन 2025-2026 करिता प्रस्तावित दर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | निवासी | निवासेत्तर | निवासी | निवासेत्तर |
| 1 | सामान्य कर | रक्कम रुपये 1/- ते 12000/- | 13% | 14% | 13% | 14% |
| | | रक्कम रुपये 12001/- ते 30000/- | 16% | 17% | 16% | 17% |
| | | रक्कम रुपये 30001/- व त्यापुढील | 24% | 24% | 24% | 24% |
| 1ब | साफसफाई कर | करयोग्यमूल्यावर | 5% | 6% | 5% | 6% |
| | अग्निशामक कर | करयोग्यमूल्यावर | 2% | 2% | 2% | 2% |
| | मनपा शिक्षणकर | करयोग्यमूल्यावर | 4% | 5% | 4% | 5% |
| 2 | मलप्रवाह सुविधा लाभ कर | करयोग्यमूल्यावर | 5% | 5% | 5% | 5% |
| 3 | पाणीपुरवठा लाभ कर | करयोग्यमूल्यावर | 4% | 5% | 4% | 5% |
| 4 | रस्ता कर | करयोग्यमूल्यावर | 2% | 3% | 2% | 3% |
| 5 | विशेष साफसफाईकर (फक्त मॉल्स, लॉजिंग बोर्डिंग, मंगल कार्यालय, सभागृह, रुग्णालय, हॉटेल्स, कॅन्टीन्स, रेस्टॉरंट या स्वरुपाच्या मिळकतींस) | करयोग्यमूल्यावर | -- | 2% | -- | 2% |
| 6 | वृक्षकर | करयोग्यमूल्यावर | 1% | 1% | 1% | 1% |
| 7 | नाटयगृहा वरील कर (करमणूक कर) | 1. सिनेमा | | | | |
| | | अ) 500 पर्यंत किंवा त्यापेक्षा जास्त बैठक व्यवस्था(सिट्स) असणा-या थिएटरला प्रती स्क्रीन | प्रती दिवस रु.250/- | | प्रती दिवस रु.250/- | |
| | | ब) मराठी सिनेमा | करमाफी | | करमाफी | |
| | | क) वातानुकुलित थिएटर प्रती स्क्रीन | प्रती दिवस रु.350/- | | प्रती दिवस रु.350/- | |
| | | 2. नाटक, सर्कस (कॉर्निव्हल टेंटस्), तमाशा, संगीत जलसे /शास्त्रीय संगीत जलसे (थियटरमधील किंवा थियटर व्यतिरिक्त प्रत्येक प्रयोगास) | प्रती प्रयोगास रु.100/- | | प्रती प्रयोगास रु.100/- | |
| | | 3. कुस्त्या / मुष्टीयुध्द | प्रती खेळास रु.50/- | | प्रती खेळास रु.50/- | |
| | | 4. वरील खेरीज इतर प्रत्येक प्रयोगास (जर वेगवेगळे खेळ नसतील तर अशा प्रत्येक दिवसास | प्रती दिवस रु.100/- | | प्रती दिवस रु.100/- | |

ब. सामान्यकरातील सवलत योजना तपशील

| अ. क्र. | लाभधारक | सवलत योजना स्वरूप | सन 2024-2025 करिता (चालू मागणीत सवलत) | सन 2025-2026 करिता (चालू मागणीत सवलत) | भरणा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | आगाऊ मालमत्ताकर भरणारे | थकबाकीसह दोन्ही सहामाहीची संपूर्ण रक्कम एक रकमी आगाऊ | देय सामान्य कर रक्कमेच्या | देय सामान्य कर रक्कमेच्या | माहे एप्रिल ते जून अखेर |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | भरणा-यां करिता | निवासी / बिगरनिवासी / मिश्र / औद्योगिक / मोकळया जमिनी इ. मालमत्ता - 5% | निवासी / बिगरनिवासी / मिश्र / औद्योगिक / मोकळया जमिनी इ. मालमत्ता - 5% | |
| | 2 | महिला | फक्त महिलांचे नावे असलेल्या फक्त एका निवासी मालमत्तेस | देय सामान्यकर रक्कमेच्या 30% | देय सामान्यकर रक्कमेच्या 30% | माहे एप्रिल ते जून अखेर |
| | 3 | दिव्यांग | 40% किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व असणा-या दिव्यांग व्यक्तींचे (अंध, दिव्यांग, मतिमंद, कर्णबधिर व मूकबधिर इ.) फक्त एका मालमत्तेस | देय सामान्य कर रक्कमेच्या 50% | देय सामान्य कर रक्कमेच्या 50% | निरंतर |
| | 4 | स्वातंत्र्य सैनिक किंवा त्यांचे पत्नी | स्वातंत्र्य सैनिक किंवा त्यांचे पत्नी यांचे फक्त एका निवासी मालमत्तेस | देय सामान्य कर रक्कमेच्या 50% | देय सामान्य कर रक्कमेच्या 50% | माहे एप्रिल ते जून अखेर |
| | 5 | ग्रीहा : ग्रीन बिल्डींग | ग्रीन बिल्डींग रेटींग सिस्टिम मालमत्ता ग्रीहा : ग्रीन बिल्डींग रेटींग सिस्टिम मधील 2500 चौ.मी. पेक्षा जास्त भूखंडावरील प्रकल्प | देय सामान्यकर रक्कमेच्या<br>• 3 Star Rating - 05%<br>• 4 Star Rating - 08%<br>• 5 Star Rating - 10% | देय सामान्यकर रक्कमेच्या<br>• 3 Star Rating - 05%<br>• 4 Star Rating - 08%<br>• 5 Star Rating - 10% | माहे एप्रिल ते जून अखेर |
| | | स्वग्रीहा : ग्रीन बिल्डींग | स्वग्रीहा : ग्रीन बिल्डींग रेटींग सिस्टिम मधील 2500 चौ.मी. पेक्षा कमी भूखंडावरील प्रकल्प | देय सामान्यकर रक्कमेच्या<br>• 1 Star Rating - 05%<br>• 2 Star Rating - 08%<br>• 3 Star Rating - 10%<br>• 4 Star Rating - 12%<br>• 5 Star Rating - 15% | देय सामान्यकर रक्कमेच्या<br>• 1 Star Rating - 05%<br>• 2 Star Rating - 08%<br>• 3 Star Rating - 10%<br>• 4 Star Rating - 12%<br>• 5 Star Rating - 15% | माहे एप्रिल ते जून अखेर |
| | 6 | ऑनलाईन पेमेंट RTGS, NEFT व IMPS मार्फत भरणा | ऑनलाईन पेमेंट गेट-वे, RTGS, NEFT व IMPS द्वारे भरणा करणारे मालमत्ताधारक | देय सामान्यकर रक्कमेच्या 5% | देय सामान्यकर रक्कमेच्या 5% | माहे एप्रिल ते जून अखेर |
| | | | | देय सामान्यकर रक्कमेच्या 4% | देय सामान्यकर रक्कमेच्या 4% | माहे जुलै ते सप्टेंबर अखेर |
| | 7 | कंपोस्टींग / एस.टी.पी. / झीरो वेस्ट यत्रंणा कार्यान्वित असलेल्या निवासी मालमत्ता | कंपोस्टींग यंत्रणा, एस.टी.पी. प्लांट, तसेच झिरो वेस्ट संकल्पना राबविणा-या इमारतींमधील निवासी मालमत्ता | देय सामान्य कर रक्कमेच्या<br>1.ऑनसाईट कंपोस्टींग यंत्रणा कार्यान्वीत असल्यास (ओला कचरा पूर्णत: जिरविणा-या)-5%<br>2.एसटीपी कार्यान्वीत असलेस - 3%<br>3.ऑनसाईट कंपोस्टींग यंत्रणा + एसटीपी कार्यान्वीत असलेस - 8%<br>4.झिरो वेस्ट संकल्पना राबविणेत येत असलेस (ओला व सुका कचरा पूर्णत: जिरविणा-या)-8%<br>5.झिरो वेस्ट + एस.टी.पी. कार्यान्वीत असलेस (ओला व सुका कचरा पूर्णत: जिरविणा-या) - 10% | देय सामान्य कर रक्कमेच्या<br>1.ऑनसाईट कंपोस्टींग यंत्रणा कार्यान्वीत असल्यास (ओला कचरा पूर्णत: जिरविणा-या)-5%<br>2.एसटीपी कार्यान्वीत असलेस - 3%<br>3.ऑनसाईट कंपोस्टींग यंत्रणा + एसटीपी कार्यान्वीत असलेस - 8%<br>4.झिरो वेस्ट संकल्पना राबविणेत येत असलेस (ओला व सुका कचरा पूर्णत: जिरविणा-या)-8%<br>5.झिरो वेस्ट + एस.टी.पी. कार्यान्वीत असलेस (ओला व सुका कचरा पूर्णत: जिरविणा-या) -10% | निरंतर |
| | 8 | शैक्षणिक इमारती | शैक्षणिक संस्थांच्या मालमत्तेमध्ये कम्पोस्टिंग यंत्रणा,झिरो वेस्ट संकल्पना,रेनवॉटर हार्वेस्टिंग व सौरउर्जा प्रकल्प असणा-या मालमत्ता | देय सामान्य कर रक्कमेच्या<br>1.ऑनसाईट कम्पोस्टिंग -4%<br>2.झिरो वेस्ट – 7%<br>3.झिरो वेस्ट+रेनवॉटर हार्वेस्टिंग - 8%<br>4.झिरो वेस्ट+सौरउर्जा | देय सामान्य कर रक्कमेच्या<br>1.ऑनसाईट कम्पोस्टिंग -4%<br>2. झिरो वेस्ट – 7%<br>3. झिरो वेस्ट+रेनवॉटर हार्वेस्टिंग - 8%<br>4.झिरो वेस्ट+सौरउर्जा–9% | निरंतर |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | –9%<br>5.झिरोवेस्ट+रेनवॉटर हार्वेस्टिंग+ सौरउर्जा –10% | 5.झिरोवेस्ट + रेनवॉटर हार्वेस्टिंग + सौरउर्जा –10% | |
| 9 | महाराष्ट्र इलेक्टीक वाहन धोरण-2021 | स्वत:च्या इलेक्ट्रीक वाहनाकरिता चार्जिंग स्टेशन उभारल्यास व त्यातून इतर इलेक्ट्रीक वाहनधारकांना चार्जिंगची सुविधा उपलब्ध केल्यास, (शासन निर्णयानुसार) | मालमत्ता करात<br>2% सूट | मालमत्ता करात<br>2% सूट | निरंतर |
| 10 | शौर्य पदकधारक, | संरक्षण दलातील शौर्य पदक धारक | मालमत्ता करात (सामान्यकर, मलप्रवाह सुविधा लाभकर, पाणीपुरवठा लाभ कर, रस्ता कर) 100% सूट | मालमत्ता करात (सामान्यकर, मलप्रवाह सुविधा लाभकर, पाणीपुरवठा लाभ कर, रस्ता कर) 100% सूट | निरंतर |
| 11 | अविवाहीत शहीद सैनिक, | अविवाहीत शहीद सैनिक (शासन निर्णयानुसार) | मालमत्ता करात (सामान्यकर, मलप्रवाह सुविधा लाभकर, पाणीपुरवठा लाभ कर, रस्ता कर) 100% सूट | मालमत्ता करात (सामान्यकर, मलप्रवाह सुविधा लाभकर, पाणीपुरवठा लाभ कर, रस्ता कर) 100% सूट | निरंतर |
| 12 | माजी सैनिक व सैनिक विधवा/पत्नी | माजी सैनिक व सैनिक विधवा पत्नी/(शासन निर्णयानुसार) | मालमत्ता करात (सामान्यकर, मलप्रवाह सुविधा लाभकर, पाणीपुरवठा लाभ कर, रस्ता कर) 100% सूट | मालमत्ता करात (सामान्यकर, मलप्रवाह सुविधा लाभकर, पाणीपुरवठा लाभ कर, रस्ता कर) 100% सूट | निरंतर |
| 13 | चालू आर्थिक वर्षात नवीन आकारणी होणा-या मालमत्ता | चालू आर्थिक वर्षात आकारणी पुस्तकात नवीन नोंद होणा-या मालमत्तांसाठी सवलत योजना | देय सामान्य कर रक्कमेच्या<br>निवासी / बिगरनिवासी / मिश्र / औद्योगिक / मोकळ्या जमिनी इ. मालमत्ता - 5% | देय सामान्य कर रक्कमेच्या<br>निवासी / बिगरनिवासी / मिश्र / औद्योगिक / मोकळया जमिनी इ. मालमत्ता - 5% | परिपत्रक क्रमांक कर/मुख्य/9/ कावि/327/2022, दिनांक 20/10/22 |
| 14 | सलग तीन वर्षे मालमत्ताकर भरणारे मालमत्ताधारक | प्रामाणिकपणे मागील 3 (तीन) सलग वर्षे मिळकतकराचा भरणा करणारे मालमत्ताधारक | देय सामान्य कर रक्कमेच्या<br>2% जादा प्रोत्साहन पर सवलत | देय सामान्य कर रक्कमेच्या<br>2% जादा प्रोत्साहन पर सवलत | निरंतर |
| 15 | स्वयंस्फुर्तीने मालमत्ता नोंद Ease Online Self-Assessment | "माझी मिळकत, माझी आकारणी" - स्वयंस्फुर्तीने महापालिकेच्या संकते स्थळावरुन मालमत्ता कर आकारणीसाठी ऑनलाईन पध्दतीने नोंदणी करणारे मालमत्ताधारक | देय सामान्यकर रक्कमेच्या - 5% | देय सामान्यकर रक्कमेच्या - 5% | निरंतर |

वरीलप्रमाणे सन 2025-2026 या आर्थिक वर्षाकरिता कर व करेत्तर बाबींचे दरास मा.महापालिका सभेची मान्यता देणे आवश्यक असल्याने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

**निर्णय** — **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार**

| | |
|---|---|
| | **मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ८३२** **विषय क्रमांक - ८३२**

**दिनांक - २८/०१/२०२५** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| ठराव क्र. ८३२<br>दिनांक -<br>२८/०१/२०२५ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र. पापु/अक्षेका/०४/५८/२०२५ दि.२१/०१/२०२५ अन्वये, मनपाचे अ क्षेत्रिय कार्यालयअंतर्गत विविध ठिकाणी उंच पाण्याच्या टाक्यावरुन तसेच आनंदनगर, संभाजीनगर परिसरात पाणीपुरवठा व्यवस्थापन करणेकरिता मजूर कर्मचारी तसेच मनपा टँकरवर वाहनचालक पुरविणे. (२०२२-२३) या कामाच्या सुधारीत खर्चास मान्यता मिळणेबाबत. |
| ठराव क्र. ८३२<br>दिनांक -<br>२८/०१/२०२५ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र. पापु/अक्षेका/०४/५८/२०२५ दि.२१/०१/२०२५ अन्वये, मनपाचे अ क्षेत्रिय कार्यालयअंतर्गत विविध ठिकाणी उंच पाण्याच्या टाक्यावरुन तसेच आनंदनगर, संभाजीनगर परिसरात पाणीपुरवठा व्यवस्थापन करणेकरिता मजूर कर्मचारी तसेच मनपा टँकरवर वाहनचालक पुरविणे. (२०२२-२३) या कामाचे आदेश क्र.पापु/०६/कावि/१६२/२०२३. दिनांक- २९/११/२०२३ (१२ महिने) रोजी ठेकेदार मे. शिवमुद्रा स्वंयरोजगार सेवा सह. संस्था मर्या. यांना प्राप्त झालेले असुन त्यानुसार त्यांचे कामकाज चालु आहे. सदर कामाची मुळ तांत्रिक मान्यता र.रु.८३,८८,९१७/- असुन त्यास सुधारित र.रु.१,१०,८३,६०३/- मान्यता मिळालेली असुन प्रशासकीय मान्यता र.रु.१,२०,००,०००/- आहे. या विभागामार्फत पुढील वर्षाच्या कामाची निविदा प्रक्रिया राबविणेत आलेली असुन सदर निविदेस कामाचा आदेश प्राप्त झालेला नसुन त्या कामाचा आदेश देऊन काम चालु होणेस अजुन किमान २ ते ३ महिनेचा कालावधी लागु शकतो,सबब 'अ' प्रभागातील पाणीपुरवठा सुरळीत राहणेसाठी सद्यस्थितीत चालू असलेले विषयांकित व्हॉल्व्ह ऑपरेशन/ मजूर पुरविणेचे (परिचालन) कामांतर्गत कार्यरत मजूर यांचेमार्फत पाणीपुरवठा चालू ठेवणे अत्यंत निकडीचे व आवश्यक असलेमुळे, मा.मुख्य अभियंता -१ ,पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी यांचे दि.२०/११/२०२४ रोजीच्या मान्य प्रस्तावानुसार,विषयांकीत कामास दि.२८/०२/२०२५ रोजी पर्यंत मुदतवाढीस मंजुरी मिळालेली आहे. तरी सदर मुदतवाढ मंजुरीच्या अनुषंगाने सन २०२४-२५ साठी तरतुद र.रु.२४,००,०००/- असुन सन २०२४-२५ चे सुधारित अंदाजपत्रकात या कामास आवश्यक तरतुद करणेत येणार आहे.सबब सदर कामाच्या सुधारित अंदाजपत्रकीय रक्कम रु.१,५१,००,०००/- चे खर्चास मा.महापालिका सभेची प्रशासकीय मान्यता मिळणे आवश्यक त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ८३३** **विषय क्रमांक - ८३३**

**दिनांक - २८/०१/२०२५** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| ठराव क्र. ८३३ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.बीपी/१६/कावि/१४/२०२५ दिनांक- २२/०१/२०२५ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील अ,ब,क,ड,इ,फ,ग व ह या क्षेत्रीय |

| | |
|---|---|
| दिनांक - २८/०१/२०२५ | कार्यालयातंर्गत अतिक्रमणावर कारवाई करणेकामी अर्धकुशल कामगार (२०२३-२०२४) याकामी तरतुद वर्ग करणेस मान्यता मिळणेबाबत . |
| ठराव क्र. ८३३<br>दिनांक - २८/०१/२०२५ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.बीपी/१६/कावि/१४/२०२५ दिनांक- २२/०१/२०२५ अन्वये,पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील अतिक्रमण कार्यवाही साठी प्रभाग स्तरावर स्थापत्य विभागामार्फत चालु व अतिक्रमण कामासाठी काढलेल्या निविदा मधून मजुर आवश्यकते नुसार पुरविले जातात त्यामुळे सदरची एकत्रित निविदा प्रक्रिया पुर्णपणे रद्द करणेस व सर्व प्रभाग स्तरावर अशा प्रकारची निविदा प्रक्रीया करुन वेगवेगळया एजन्सीकडून कामे करणेकामी मा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी दि.२२/१०/२०२४ रोजी प्रस्तावास मान्यता दिलेली आहे.<br>पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०२३-२४ चे सुधारित व सन २०२४-२५ चे मुळ अंदाजपत्रकात या कामी उपलब्ध तरतुद र.रु.३,७५,००,०००/- (पान क्र. ४३९/१) आठही प्रभागांमध्ये र.रु.४६,८७,५००/- इतकी विभागून देणे व त्यानुसार प्रभाग स्तरावर कार्यकारी अभियंता यांनी या कामी स्वतंत्र निविदा प्रक्रिया करणेकामी पुढील प्रमाणे तरतुद वर्ग करणे आवश्यक असल्याने त्यास मा.महापालिका सभेची प्रशासकिय मान्यता मिळणे आवश्यक त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रक | सन २०२४-२५ चे मुळअंदाजपत्रकात उपलब्ध तरतुद | वाढ करावयाची तरतुद | घट करावयाची तरतुद |
|---|---|---|---|---|---|
| १ | पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील अ,ब,क,ड,इ,फ,ग व ह या क्षेत्रीय कार्यालयातंर्गत अतिक्रमणावर कारवाई करणेकामी अर्धकुशल कामगार (२०२३-२०२४) | महसूली | 3,75,00,000 | 0 | 3,75,00,000 |
| २ | अ क्षेत्रीय कार्यालयातंर्गत अतिक्रमणावर कारवाई करणेकामी अर्धकुशल कामगार पुरविणे बाबत | महसूली | 0 | 46,87,500 | 0 |
| ३ | ब क्षेत्रीय कार्यालयातंर्गत अतिक्रमणावर कारवाई करणेकामी अर्धकुशल कामगार पुरविणे बाबत | महसूली | 0 | 46,87,500 | 0 |
| ४ | क क्षेत्रीय कार्यालयातंर्गत अतिक्रमणावर कारवाई करणेकामी अर्धकुशल कामगार पुरविणे बाबत | महसूली | 0 | 46,87,500 | 0 |
| ५ | ड क्षेत्रीय कार्यालयातंर्गत अतिक्रमणावर कारवाई करणेकामी अर्धकुशल कामगार पुरविणे बाबत | महसूली | 0 | 46,87,500 | 0 |
| ६ | इ क्षेत्रीय कार्यालयातंर्गत अतिक्रमणावर कारवाई करणेकामी अर्धकुशल कामगार पुरविणे | महसूली | 0 | 46,87,500 | 0 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | बाबत | | | | |
| ७ | फ क्षेत्रीय कार्यालयातंर्गत अतिक्रमणावर कारवाई करणेकामी अर्धकुशल कामगार पुरविणे बाबत | महसूली | 0 | 46,87,500 | 0 |
| ८ | ग क्षेत्रीय कार्यालयातंर्गत अतिक्रमणावर कारवाई करणेकामी अर्धकुशल कामगार पुरविणे बाबत | महसूली | 0 | 46,87,500 | 0 |
| ९ | ह क्षेत्रीय कार्यालयातंर्गत अतिक्रमणावर कारवाई करणेकामी अर्धकुशल कामगार पुरविणे बाबत | महसूली | 0 | 46,87,500 | 0 |
| | एकूण | | **3,75,00,000** | **3,75,00,000** | **3,75,00,000** |

| | |
|---|---|
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ८३४** **विषय क्रमांक - ८३४**

**दिनांक - २८/०१/२०२५** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| ठराव क्र. ८३४<br>दिनांक -<br>२८/०१/२०२५ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.नरवि/कावि/४९/२०२५ दिनांक- २२/०१/२०२५ अन्वये, पिंपरी चिंचवड म.न.पा.चे नगररचना विभागासाठी सर्व्हेक्षण करणेसाठी ‘सल्लागार सर्व्हेक्षक’ म्हणुन नेमणूकीस मुदतवाढ देणेबाबत. |
| ठराव क्र. ८३४<br>दिनांक -<br>२८/०१/२०२५ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.नरवि/कावि/४९/२०२५ दिनांक- २२/०१/२०२५ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत मंजुर विकास आराखड्यामधील रस्ते व आरक्षणाच्या जागा संपादन करणेसाठी सर्व्हेक्षण विषयक कामे करणेसाठी सर्व्हेक्षक सल्लागारांचे पॅनल नेमणेकरिता मा.स्थायी समिती ठराव क्र.४८४९, दि.१२/०६/२०१९ अन्वये सात सल्लागारांची नेमणूक ३ वर्षासाठी महानगरपालिकेच्या पॅनलवर नेमणुकीस मान्यता दिली आहे. तसेच मा. महापालिका सभा ठराव क्र.६५६१, दि.२९/०१/२०२० अन्वये या विभागाची सर्व्हेक्षक विषयक कामे करून घेणेसाठी ढोबळ अंदाजपत्रक तयार करणेत आले असुन त्याची तांत्रिक मान्यता घेऊन नगररचना विभागाच्या मंजूर विकास आराखड्यामधील रस्ते व आरक्षणांच्या सर्व्हेक्षक कामासाठी येणा-या अंदाजपत्रकीय खर्च र.रू.१,००,००,०००/- यांस मान्यता देणेत आली आहे. पिंपरी- चिंचवड महानगरपालिकेच्या नगररचना विभागाकडील सर्वेक्षण कामासाठी "सर्वेक्षक सल्लागार" (Survey Consultant) म्हणून या ७ सल्लागारांची नेमणूक ३ वर्षासाठी मनपा पॅनेलवर नेमणूक देऊन जा.क्र.नरवि/कावि/११/९२/२०२०, दि.१०/०६/२०२० अन्वये, विषयांकित कामाचे आदेश देणेत आले होते. परंतु दरम्यानच्या काळात कोविड-१९ या साथीचे रोगाचा प्रादुर्भाव |

| | |
|---|---|
| | उद्भवलेने देशभर संपुर्ण टाळेबंदी (Lockdown) जाहीर करणेत आलेने कामे करता आली नाहीत.<br><br>विषयांकित कामाची मुदत दि.०९/०६/२०२३ रोजी संपुष्टात आली असुन उर्वरीत कामे करणेसाठी सल्लागार सर्वेक्षक मे.एच.टी. जाधव अँण्ड असो. तर्फे भागीदार श्री.राजेंद्र हरिभाऊ जाधव यांनी पुढील ३ वर्षे मुदतवाढ मिळणेकामी विनंती अर्ज केला आहे. सल्लागार सर्वेक्षक सन २०१९ मधील मंजूर झालेल्या निविदा दरानेच पुढील तीन वर्षं काम करणेस तयार आहेत. सदर निविदेचे अंदाजपत्रक सन २०१८-१९ चे SSR (Standard Schedule Rate) नुसार करण्यात आले होते. विषयांकित कामाची नव्याने निविदा प्रक्रिया चालू केलेस निविदा प्रक्रियेस अतिरिक्त वेळ लागू शकतो, तसेच सन २०२२-२३ चे SSR (Standard Schedule Rate) दरात वाढ झालेने जुन्या निविदा दरानेच काम करून घेतलेस महानगरपालिकेचा आर्थिक फायदा होणार आहे. विषयांकित कामासाठी केवळ वाढीव मुदतवाढ देणे प्रस्तावित आहे. काम मुळ रक्कमेपेक्षा जास्त होत नाही. त्यामुळे पुन्हा करारनामा करणेची आवश्यकता नाही. तरी सदर कामाची आवश्यकता व निकड लक्षात घेता विषयांकित कामासाठी उपरोक्त नमूद 'सल्लागार सर्वेक्षक' यांना २ वर्षे (दि. ७/०६/२०२५ पर्यंत) मुदतवाढ देणे आवश्यक असल्याने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ८३५** **विषय क्रमांक - ८३५**

**दिनांक - २८/०१/२०२५** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| ठराव क्र. ८३५<br>दिनांक -<br>२८/०१/२०२५ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र. पर्या/१७/कावि/३४९/२०२५ दिनांक-२८/०१/२०२५ अन्वये, पिंपरी चिंचवड कार्यक्षेत्रामध्ये GRAP (Graded Response Action Plan) ची प्रभावी अंमलबजावणी करणेकरीता आवश्यक असलेल्या बाबींच्या दंडाची रक्कम निश्चितीस मान्यता देणेबाबत. |
| ठराव क्र. ८३५<br>दिनांक -<br>२८/०१/२०२५ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र. पर्या/१७/कावि/३४९/२०२५ दिनांक-२८/०१/२०२५ अन्वये, पिंपरी चिंचवड मनपा कार्यक्षेत्रात GRAP ची अंमलबजावणीकामी दोन स्वतंत्र एजन्सींची नेमणुक करणेत आलेली आहे. सदर एजन्सींमार्फत पर्यावरणास हानी पोहोचविणाऱ्या दोषींवर नियमाधिन कारवाई करुन दंड वसुल केला जातो. तथापि, साईटवर काम करणाऱ्या एजन्सींना आलेल्या प्रत्यक्ष अनुभवानुसार नागरीक / व्यवसायिक / कारखानदार तसेच अज्ञात व्यक्तींकडून केल्या जाणाऱ्या शहर विद्रुपीकरण व अस्वच्छतेबाबतच्या बऱ्याच बाबींकरीता दंडाची रक्कम GRAP च्या मार्गदर्शकांमध्ये नमुद नसल्यामुळे GRAP अंतर्भूत केल्या गेलेल्या बाबींव्यतिरिक्तच्या कारवाई करीता दंड आकारण्यास उपद्रव शोध पथकास अडचण होत आहे. तसेच कामकाजाच्या सुसुत्रतेकरीता GRAP समितीची स्थापना करणे आवश्यक आहे. त्यानुसार GRAP मध्ये अंतर्भूत नसलेल्या बाबींव्यतिरिक्तच्या बाबींकरीता दंडाची रक्कम प्रपत्र १ ते ५ अन्वये निश्चित करणेत आली असुन GRAP समितीची स्थापनेस व अंतिम करणेत आलेल्या दंडाच्या रकमेस मा. महापालिका सभेची मान्यता देणे आवश्यक आहे.<br><br>GRAP मध्ये अंतर्भूत नसलेल्या बाबींव्यतिरिक्त नागरीक / व्यवसायिक / कारखानदार |

| | |
|---|---|
| | तसेच अज्ञात व्यक्तींकडून केल्या जाणाऱ्या शहर विद्रुपीकरण / अस्वच्छतेकरीता प्रपत्र १ ते ५ मध्ये नमूद केलेप्रमाणे निश्चित करणेत आलेल्या दंडाच्या रकमेस व GRAP समितीच्या स्थापनेस मा.महापालिका सभेची मान्यता देणे आवश्यक असल्याने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ८३६** **विषय क्रमांक - ८३६**

**दिनांक - २८/०१/२०२५** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| ठराव क्र. ८३६<br>दिनांक -<br>२८/०१/२०२५ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र. पर्या/१७/कावि/३५० /२०२५ दिनांक-२८/०१/२०२५ अन्वये, पिंपरी चिंचवड कार्यक्षेत्रामध्ये GRAP (Graded Response Action Plan) ची प्रभावी अंमलबजावणी करणेकरीता GRAP समितीच्या स्थापनेस मान्यता देणेबाबत. |
| ठराव क्र. ८३६<br>दिनांक -<br>२८/०१/२०२५ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र. पर्या/१७/कावि/३५० /२०२५ दिनांक-२८/०१/२०२५ अन्वये, पिंपरी चिंचवड मनपा कार्यक्षेत्रात GRAP ची अंमलबजावणीकामी दोन स्वतंत्र एजन्सींची नेमणुक करणेत आलेली आहे. सदर एजन्सींमार्फत पर्यावरणास हानी पोहोचविणाऱ्या दोषींवर नियमाधिन कारवाई करुन दंड वसुल केला जातो. तथापि, साईटवर काम करणाऱ्या एजन्सींना आलेल्या प्रत्यक्ष अनुभवानुसार नागरीक / व्यवसायिक / कारखानदार तसेच अज्ञात व्यक्तींकडून केल्या जाणाऱ्या शहर विद्रुपीकरण व अस्वच्छतेबाबतच्या बऱ्याच बाबींकरीता दंडाची रक्कम GRAP च्या मार्गदर्शकांमध्ये नमुद नसल्यामुळे GRAP अंतर्भूत केल्या गेलेल्या बाबींव्यतिरिक्तच्या कारवाई करीता दंड आकारण्यास उपद्रव शोध पथकास अडचण होत आहे. तसेच कामकाजाच्या सुसुत्रतेकरीता GRAP समितीची स्थापना करणे आवश्यक आहे. त्यानुसार GRAP मध्ये अंतर्भूत नसलेल्या बाबींव्यतिरिक्तच्या बाबींकरीता दंडाची रक्कम प्रपत्र १ ते ५ अन्वये निश्चित करणेत आली असुन GRAP समितीची स्थापनेस मा. महापालिका सभेची मान्यता देणे आवश्यक असल्याने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देण्यात येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ८३७** **विषय क्रमांक - ८३७**

**दिनांक - २८/०१/२०२५** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| ठराव क्र. ८३७<br>दिनांक -<br>२८/०१/२०२५ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र. फक्षेका/ वि/०२/४१/२०२५ दिनांक-२८/०१/२०२५ अन्वये, फ क्षेत्रीय कार्यालय प्रभाग क्र.१३ से.नं. २२ अमरधाम स्मशानभूमि मधील विद्युत दाहिनीचे वार्षिक पद्धतीने चालन व देखभाल दुरुस्ती करणे या कामास वाढीव खर्चास सुधारित प्रशासकीय मान्यता देणे बाबत. |
| ठराव क्र. ८३७<br>दिनांक -<br>२८/०१/२०२५ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र. फक्षेका/ वि/०२/४१/२०२५ दिनांक-२८/०१/२०२५ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या फ क्षेत्रिय कर्यालयांतर्गत येणा-या से.२२ अमरधाम स्मशानभूमि या ठिकाणी दोन विद्युत दाहिन्या कार्यरत असून सदर विद्युत दाहिन्यांचे चालन व दैनंदिन देखभाल दुरुस्तीचे कामे करणे या करिता निविदा नोटीस २१-१० /२०२२-२३ व कामाचे आदेश क्र.वि/मु.का/१४५/२०२३ दिनांक २७/०३/२०२३ नुसार मे. कल्याणी एन्टरप्राईजेस तळवडे-पुणे यांना देण्यात आले आहे. सदर कामाची मुदत १८ महिने म्हणजेच दिनांक ३० जून २०२४ पर्यंत होती. विषयांकित कामाची निविदा रक्कम रु. ८३,७०,०००/- इतकी असून निविदा दर १२.६% कमी याप्रमाणे आहे. म्हणजेच दि. ३०/०६/२०२४ पर्यंत सदर कामावर र. रु. (७३,१५,३८० + GST १३,१६,७६८) ८६,३२,१४८/- इतका खर्च झालेला आहे. दरम्यानच्या काळात सार्वजनिक लोकसभा निवडणूक २०२४ च्या आचारसंहितेमुळे सदर कामाची नवीन निविदा काढणेची कार्यवाही प्रलंबित राहिल्याने व सदर कालावधीत निगडी स्मशानभूमी येथील दोन्ही विद्युत दाहीन्या पूर्ण क्षमतेने चालविणे क्रमप्राप्त असलेने तसेच माहे ऑगस्ट/सप्टेंबर मधे पूरजन्य परिस्थितीमुळे शहरातील नदीकाठी असलेल्या विद्युत दाहीन्या बंद ठेवावे लागल्यामुळे अमरधाम स्मशानभूमीवरील ताण वाढला असल्याने मा. स्थायी समिती ठराव क्र. ३८२५ दि. ३०/७/२०२४ अन्वये विषयांकित कामास वाढीव खर्चासह माहे सप्टेंबर २०२४ अखेर प्रथम मुदतवाढ घेणेत आलेली आहे. विषयांकित कामासाठी नवीन निविदा दि. ११/०७/२०२४ रोजी प्रसिद्धीस देणेत आलेली असून निविदा उघडण्याचा दि. २९/०७/२०२४ रोजी आहे. परंतु विभागाकडील सदर कामाबरोबर इतर निविदा कामे असलेने निविदा विशेष अटी शर्ती मान्यतेस काही कालावधी लागलेने त्यानुसार निविदाकार यांचे पात्र / अपात्र ठरविणेसाठी काही कालावधी लागलेला आहे.<br><br>सबब सदर निविदा कार्यपूर्तता करून दि. १५/१०/२०२४ रोजी पात्र निविदाकारांची देकार उघण्यात आलेली असून लघुत्तम निविदाकाराबरोबर करारनामा करणे त्यास मा. स्थायी समितीची मान्यता घेणे इत्यादी कार्यवाही महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ च्या आचारसंहिते नंतरच होणार आहे. वरील बाबींचा विचार करता विषयांकित कामासाठी पुढील अजून तीन महिन्यांकरिता म्हणजेच माहे डिसेंबर २०२४ अखेर मंजूर निविदा दराने र. रु. १४,३८,६९२/- GST सह वाढीव खर्चाचा (म्हणजेच मूळ खर्च ८६,३२,१४८/- + पहिल्या मंजूर तीन महिन्यासाठीचे वाढीव खर्च र. रु. १४,३८,६९२/- + |

| | |
|---|---|
| | प्रस्तावित तीन महिन्यांचा वाढीव खर्च र. रु. १४,३८,६९२/- असे एकूण खर्च र. रु. १,१५,०९,५३२/- GST सह) प्रस्तावास मा. स्थायी समिती सभेची ठराव क्र. ४५०८ दि. २४/१२/२०२४ नुसार मान्यता मिळालेली आहे तसेच सदर कामास सन २०२४-२५ चे अंदाजपत्रक पान क्र. ३५३ अ.क्र.९५ वर र.रू. १००००००००/- इतकी प्रशासकीय मान्यता देणेत आलेली आहे. वरील वाढीव खर्च प्रशासकीय मान्यता रकमेपेक्षा जास्त होत असल्याने सदर कामास र.रू. १३१७००००/- इतकी मा. महापालिका सभेची सुधारित प्रशासकीय मान्यता देणे आवश्यक असल्याने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देण्यात येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

सही/-
**(चंद्रकांत पोपट इंदलकर)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

**सही/-**
**(शेखर सिंह)**
**मा.प्रशासक**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**